# दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य

– डॉ. पवन मांडवकर

इ.स. १९६० नंतर वेगवेगळे वाङ्मयप्रवाह मराठी साहित्यात अवतरले आणि त्यातच 'दलित साहित्या'चा खऱ्या अर्थाने उदय झाला. तत्पूर्वी 'ग्रामीण साहित्य' आणि 'दलित साहित्य' यांची एकत्र सांगड घातली जायची. तसे दोन्ही प्रवाह आज भिन्न वाटत असले तरी ते एकमेकांशी जवळीकता राखूनच आहेत. गावकुसाच्या आतील साहित्य ते 'ग्रामीण' आणि गावकुसाबाहेरील साहित्य ते 'दलित' असेही म्हटले गेले.

ग्रामीण, दलित किंवा प्रादेशिक असे साहित्याचे वेगवेगळे प्रकार मानणे गजरेचे आहे का? की ज्या साहित्यिकांना मराठी साहित्याच्या व्यासपीठावर सन्मानाचे स्थान मिळाले नाही, त्यांनी या चळवळी सुरू केल्या? अशी व्यासपीठे नवोदित लेखकांना घडवू शकतात का? आज खेड्यांचे शहरीकरण झपाट्याने होत आहे. पुरोगातमी महाराष्ट्रात दलितबहुजनांवर होणारे अन्याय–अत्याचार संपुष्टात आले आहेत, तेव्हा दलित, ग्रामीण साहित्याची आणि वेगळ्या चुलींची गरज आहे का? असे अनेक प्रश्न उपस्थित केले गेले आणि टीकाकारांनी या साहित्यप्रकारांवर आणि चळवळींवर टीकाही केली. या टीकाकारांना आपल्या लेखणीने नामवंत दलित आणि ग्रामीण साहित्यिकांनी समर्थनार्थ समर्पक उत्तरेही दिली. आपल्या देशाचा खरा कणा हा ग्रामीण भाग आहे. दलित समाजाचे खरे दर्शन होते ते ग्रामीण भागातच. जवळपास ८० टक्के देशाची जनता ग्रामीण भागात वास्तव्य करते. या भूमीशी असलेले त्यांचे नाते, मातीचा स्पर्श, इथला कसदारपणा दलित, ग्रामीण, आदिवासी, प्रादेशिक साहित्यातच पहावयास मिळतो. तो पाश्चिमात्त्य संस्कृतीत गुरफटलेल्या, अनुकरण केलेल्या आणि निवडक वर्गासाठी, शहरी पांढरपेशा वाचकांसाठी तयार केलेल्या साहित्यात मिळेल का? खेडूत, मागास म्हणून हिणवणाऱ्या, अव्हेरणाऱ्या वातानुकुलीत केबीनमधल्या मूठभर समीक्षकांनी आणि साहित्यिकांनी खरा भारत अनुभवायचा असेल तर

ISBN 978-81-925945-0-7

अशा प्रत्येक प्रवाहाचे मोठ्या मनाने स्वागत केले पाहिजे. लेखनाचा फारसा अनुभव नाही किंवा वाङ्मयनिर्मितीच्या आणि दर्जाच्या कसोटीत दलित, ग्रामीण, प्रादेशिक साहित्य मागे पडते असे आरोप करण्यापेक्षा नवनवीन प्रवाहनिर्मात्यांना, नवोदितांना मार्गदर्शन करण्याचे कार्य प्रस्थापितांनी, समीक्षकांनी केले पाहिजे. दलित साहित्याचा अभ्यास करणारे ते दलितच असतात किंवा ग्रामीण साहित्याचा अभ्यास करणारे हे खेड्यातीलच असतात आणि त्यांची मानसिकता तशा प्रकारची झालेली असते, असा गैरसमज होता कामा नये. मराठी साहित्याची समृद्धता वाढवायची असेल तर प्रत्येक प्रवाहाचे स्वागत हे व्हायलाच हवे आणि त्याचे नि:पक्षपातीपणाने विश्लेषणही केले जावे.

वास्तविकत: दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य हे तीनही प्रवाह एकमेकांमध्ये गुंतले आहेत तसेच काही बाबींमध्ये एकमेकांपासून अंतर राखून आहेत. पुष्कळदा ग्रामीण साहित्याचे वर्तूळ हे मोठे असते आणि त्यात प्रादेशिक साहित्य आपली जागा ग्रहण करते तर दलित साहित्यात आढळणारी, दलितांनी भोगलेली बहुतांश क्लेशदायक प्रसंगवर्णने ही ग्रामीण भागात घडलेली असतात. त्यामुळे दलितत्वाच्या जाणिवा ग्रामीण भागात तीव्र असतात आणि साहजिकच ती वर्णने त्या त्या प्रदेशाला चिकटून असतात; आणि म्हणूनच तीनही प्रवाहांचा संबंध एकमेकांशी येतो. पण सुरुवातीची निर्मिती वगळता दलित साहित्याने आपली चूल वेगळी मांडण्याचा प्रयत्न केला. प्रादेशिकता प्रकट करणाऱ्या साहित्याला मात्र साहजिकच ग्रामीण साहित्याने आपल्या कुशीत घेतले. कारण केवळ आम्ही प्रादेशिक साहित्यिक किंवा ग्रामीण साहित्यिक असा दलित साहित्यिकांप्रमाणे शिक्का मारून हे साहित्य प्रसवले गेले नाही. त्यामुळे दलित साहित्याची चूल ही ग्रामीण किंवा एखाद्या विशिष्ट प्रदेशातही पेटलेली असली तरी ती गावकुसाच्या आत न राहता बाहेरच राहून आपले वेगळेपण सिद्ध करताना दिसते.

बाबासाहेबांनी केलेल्या धर्मांतराचा फार मोठा परिणाम दलित समाजावर झाला. या समाजाला 'स्व'ची जाणीव झाली. हजारो वर्षे अंधारात खितपत

ISBN 978-81-925945-0-7

पडलेल्या दलित जीवनाला आत्मभानाचा प्रकाश मिळाला. स्वाभिमानाची ज्योत प्रज्वलीत झाली. अन्याय–अत्याचाराचा प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निर्माण झाले आणि पुढे १९६०–६५च्या सुमारास दलित साहित्याचा खरा उदय झाला, तोही बाबासाहेबांना प्रेरणास्थानी ठेवूनच. कोणतीही वाङ्मयीन प्रवृत्ती निर्माण होण्यासाठी त्या अगोदर त्या प्रवृत्तीच्या संदर्भात वैचारिक पार्श्वभूमी तयार व्हावी लागते. विशिष्ट अशा स्वरूपाची जीवनविषयक दृष्टी प्रथम विचारांतून मांडली जाते आणि तिच्याच आधारावर सृजनशील साहित्यिक साहित्यातून ती मांडत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी वैचारिक जीवनदृष्टी मांडली, तीच नंतर दलित साहित्यातून व्यक्त होत गेली. बाबासाहेबांची तर्कशुद्धता, बुद्धिनिष्ठा, अंधश्रद्धेस आणि व्यक्तिपूजेस विरोध ही शिकवण दलित साहित्यातून उमटत गेली. ज्या संस्कृतीने गावकुसाबाहेरील समाजाला 'माणूस' म्हणून जगण्याचा हक्क नाकारला, त्या संस्कृतीलाच बाबासाहेबांनी आव्हान दिले आणि त्यांच्याच शिकवणुकीतून वेदना, विद्रोह, नकार या त्रिसूत्रांवर आधारित दलित वाङ्मय निर्माण झाले.

जो जो शोषित तो तो दलित आणि त्याच्याविषयी लिहिलेले साहित्य हे दलित साहित्य हा अनेक दलित आणि दलितेतर विचारवंतांनी पूर्वी मांडलेला मुद्दा अनेकांच्या, प्रामुख्याने दलित साहित्यिकांच्याच पचनी न पडल्याने जन्मप्राप्त दलितत्व ही कसोटी मान्यता पावली. दुसरा गमतीदार मुद्दा म्हणजे जन्माने दलित असला आणि जर दलितांचा भोगवटा वर्णन करण्याऐवजी रंजनात्मक किंवा अन्य वैविध्यपूर्ण साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यिकाला दलित साहित्यिक म्हणून स्वीकारण्याचा दृष्टिकोन दिसून येत नाही. ग्रेस यांचे साहित्य हे दलित साहित्य असल्याचे दलित किंवा दलितेतर अभ्यासक मान्य करत नाहीत. म्हणजेच जन्माने दलित आणि त्याच्या साहित्यात विद्रोह, नकारयुक्त दलित संवेदनांसह दलित जीवनाचे चित्रण असेल तरच ते दलित साहित्य हाच विचार पुढे आला. शिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाच प्रेरणास्थान मानून निर्माण झालेले साहित्य तेच दलित साहित्य असे मानल्याने पूर्वी संत चोखामेळा, कर्ममेळा, सोयराबाई किंवा अन्य जातीच्या संतांनी केलेल्या रचनांनाही दलित

ISBN 978-81-925945-0-7

साहित्य म्हणण्यात आले नाही. इ.स. १८८८ मध्ये आधुनिक मराठी कवितेचे जनक कवी केशवसुत यांची 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' ही कविता मराठी काव्यक्षेत्रात अवतरली आणि एक वेगळीच खळबळ माजली. या कवितेत आपल्या सावलीचा एका सद्‌गृहस्थाला विटाळ का व्हावा, हे कोडे एका छोट्या मुलाला उलगडत नाही. घरी जाऊन तो आईला विचारतो,

'जरी त्यावरी सावली माझि गेली,
तरी काय बाधा असे ठेवलेली?'

आई बिचारी एवढंच म्हणते,

'आम्ही नीच बा, आणि ते लोक थोर!
तया पाहता होइजे नित्य दूर.'

त्याचप्रमाणे 'श्री.म. माटे ह्यांनी गावकुसाबाहेरील व्यक्तींच्या व्यथा 'उपेक्षितांचे अंतरंग' ह्या पुस्तकात मांडल्या. विभावरी शिरूररांनी 'बळी' ह्या कादंबरीत मांगगारूडी जातीचा नायक चित्रीत केला. 'देवकी' या नाटकात मधु मंगेश कर्णिकांनी 'देवदासी'ची व्यथा प्रकट केली. जयवंत दळवी ह्यांनी 'चक्र' या कादंबरीत झोपडपट्टीची कहाणी सांगितली. तरीपण ह्या साहित्यिकांना दलित साहित्यिक मानले जात नाही किंवा ह्या साहित्यकृतींचा 'दलित साहित्य' या नावाखाली विचार होत नाही, हे सर्व साहित्यिक जन्मदलित नाहीत.'[१]

'दलित साहित्याने आज आपला सवता सुभा मांडलेला असला तरी त्याचे आखात ग्रामीण साहित्यात माटे–माडगूळकरांपासून घुसलेले आहे. दलित जीवन त्याच्या कोंडमाऱ्यासह व खदखदणाऱ्या असंतोषासह ग्रामीण परिसरात अधिक स्वाभाविकतेने आढळते. म्हणून आजचे दलित साहित्यही अपरिहार्यपणे ग्रामीण परिवेशात सामोरे येत आहे.'[२] चंद्रकुमार नलगे यांच्या 'गस्त' कादंबरीतून दलितांचे चित्रण आहे; परंतु संवेदना ग्रामीण आहे तर अरुण साधूंच्या 'बहिष्कृत' कादंबरीतून येणारी वर्णने ग्रामीण जीवनात घडत असली तरी त्यात केंद्रस्थानी दलित संवेदना आहे. नामदेव ढसाळांच्या १९८१ मध्ये प्रकाशित 'हाडकी हाडवळा' या कादंबरीमध्ये दलित संवेदनेपेक्षा ग्रामीण संवेदना अधिक आहे.

ISBN 978-81-925945-0-7

आर्थिक शोषण, धर्मपरंपरा यांबरोबरच ग्रामीण जीवनाचे संपूर्ण वर्णन त्यात असल्याने ती दलित कादंबरी कमी आणि ग्रामीण अधिक वाटते.

केशव मेश्राम, बाबुराव बागूल, अशोक व्हटकर किंवा माधव कोंडविलकर यांच्या दलित साहित्यातून ग्रामीण संवेदना व्यापक प्रमाणात आढळतात. मात्र ग्रामीण साहित्यामध्ये दलित संवेदन कमी असते. वास्तविक दलित आणि ग्रामीण या दोनही चळवळी स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवण्याचा आणि स्वतःची पृथगात्मता जपताना समांतर जाताना दिसतात. तसेच १९४० ते १९६० या काळात प्रादेशिकतेचा बहर होता. मात्र त्यानंतर याच प्रादेशिक कादंबऱ्या ग्रामीण म्हणून स्वीकारल्या गेल्या. कुठल्याही कादंबरीला प्रदेशभूमी आधार असतेच. प्रादेशिक कादंबरीमध्ये संपूर्ण प्रदेशच स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राखून असतो. तो त्या कादंबरीचा अविभाज्य भाग असतो. त्यातील कथानक त्याच्याशी इतके एकरूप झालेले असते की कदाचित ते इतरत्र घडू शकलेही नसते. प्रदेश हीच या साहित्याची प्रेरणा असते. प्रदेशाने आकारलेले मानवी जीवन अनुभवता येते. तिथली बोलीभाषा, प्रदेशाचा मनोधर्म, लोकजीवन आणि वैशिष्ट्य जोपासणाऱ्या या लेखनाला प्रादेशिक म्हटले जाते. हेच लेखन ग्रामीण म्हणूनही स्वीकारले जाते. 'ग्रामीण' आणि 'नागर' ही जशी परस्परविरोधी विशेषणे आहेत, तशी 'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' ही समांतर आहेत. समूहदर्शन आणि परिसरप्राधान्य या वैशिष्ट्यांमुळे विस्तृत कॅनव्हास रंगविणाऱ्या ग्रामीण कलाकृती 'प्रादेशिक' म्हणून गणल्या जातात. म्हणूनच १९६० पूर्वी निर्माण झालेली बाह्यवास्तवाची जाणीवपूर्वक दखल घेणारी, भौगोलिक परिसराशी प्रामाणिक राहणारी ग्रामीण कादंबरी 'प्रादेशिक' म्हणून ओळखली गेली. विशिष्ट भूप्रदेश, प्रदेशनियत लोकांचे जीवन, सामूहिकता आणि प्रदेश हाच नायक असल्याने प्रदेशाचेच यथार्थ चित्रण ही वैशिष्ट्ये प्रादेशिक साहित्याची मान्य करण्यात आली.

वि.स. सुखटणकर हे पहिले प्रादेशिक कथाकार म्हणून ओळखले जातात. त्यांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' अर्थात 'आजकालचा गोमंतक' हा पहिला कथासंग्रह १९३१ मध्ये प्रसिद्ध झाला. तेव्हापासून ग्रामीण साहित्याच्या

ISBN 978-81-925945-0-7

बरोबरीने प्रादेशिक साहित्य निर्माण होत आहे. बा.भ. बोरकर यांनी 'प्रादेशिक' ही संज्ञा १९३० साली मडगांव येथे भरलेल्या साहित्य संमेलतनात ऐकल्याचे सांगितले. प्रादेशिक साहित्यात भौगोलिकदृष्ट्या अस्तित्वात असलेला एक वैशिष्ट्यपूर्ण भूप्रदेश, तेथील माणसे, त्यांचे प्रादेशिक मन जाणवते. म्हणजेच प्रादेशिक वाङ्मय व्यक्तिकेंद्रित न राहता समूहकेंद्रित बनते.

१९६० पूर्वी ज्या साहित्यात प्रदेश हा महत्त्वाचा ठरत होता, त्याच ग्रामीण साहित्यात साठनंतर स्थलनिष्ठता किंवा परिसरप्राधान्यता गौण ठरत गेली. १९८० नंतर आधुनिकतेचा पुरस्कार करणारे साहित्य अवतरले आणि ग्रामीण साहित्याची दिशा बदलत गेली. त्याचबरोबर पूर्वी येणारी दलिततत्त्वाची वर्णनेही कमी झाली आणि 'दलित' व 'ग्रामीण' यांच्यातल्या सीमारेषा स्पष्ट जाणवू लागल्या.

'ग्रामीण' आणि 'प्रादेशिक' या संज्ञेमधून अभिव्यक्त होणारा अर्थ सारखाच असेल, असे मात्र नाही. ते परस्परांना समांतर असतील; परंतु ते एक नव्हेत, कारण प्रादेशिक साहित्य ग्रामजीवनाला, संस्कृतीला फारसे महत्त्व न देता ते एका विशिष्ट प्रदेशाच्या टापूला महत्त्व देते. ग्रामीण साहित्यामधून व्यक्तिकेंद्रितता दिसते, तर प्रादेशिक साहित्यामध्ये समूह केंद्रस्थानी असतो. प्रादेशिक साहित्यामध्ये एखादी व्यक्ती नायक म्हणून आलेली असली तर तिच्यातून संपूर्ण प्रदेश ध्वनीत होत असतो. 'ग्रामीण साहित्य' ही संकल्पना एखाद्या प्रदेशांतर्गत जीवनातून निर्माण झालेल्या साहित्याला वापरली जाते. ग्रामीण साहित्यालाच प्रादेशिक साहित्य ही संज्ञा वापरली जाते. मात्र ग्रामीण साहित्य किंवा प्रादेशिक साहित्य हे एकस्वरूपी नाहीत, असे मत डॉ. आनंद यादव, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, डॉ. द.भि. कुलकर्णी, प्रा. म.सु. पाटील, डॉ. स.रा. गाडगीळ या अभ्यासकांनी अनेकदा मांडले आहे.

एकोणविसाव्या शतकात ग्रामीण साहित्याचा विचार करताना 'बळीबा पाटील' ही १८८८ मध्ये प्रसिद्ध झालेली कृष्णराव भालेकरांची एकमेव कादंबरी दिसते. त्यानंतर १९०३ मधील धनुर्धारींची 'पिराजी पाटील' अशा दोन कादंबऱ्या

ग्रामीण साहित्याच्या प्रारंभबिंदू म्हणून ओळखल्या जातात. वास्तविक पाहता आधुनिक साहित्य म्हणूनच ग्रामीण साहित्याकडे बघितले जाते. १८२० ते १८७० हा राजकीय आणि सामाजिक दृष्टीने प्रबोधनाचा काळ होता. या काळात साहित्याचे प्रवाह निर्माण होत होते; मात्र ते पांढरपेशा जीवनाशीच संबंधित होते. १८९७ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. या संदर्भातील माहिती 'डेक्कन सभे'च्या दप्तरात हरिभाऊ आपटे यांना वाचायला मिळाली आणि करुणेपोटी त्यांनी 'काळ तर मोठा कठीण आला' ही कथा लिहिली. ती ग्रामीण जीवन जगणाऱ्या शेतकऱ्यांच्या जीवनानुभवावर नसून दुष्काळाने शेतकऱ्यांची वाताहत कशी झाली, याचे वर्णन त्यात आहे. नागर भाषेचा वापर असलेल्या या कथेला 'ग्रामीण कथेची पायरीखालची पायरी' असे म्हटले गेले आणि तिचे महत्त्व नामदेवाच्या पायरीप्रमाणे मानले गेले.

महात्मा गांधींनी दिलेल्या 'खेड्याकडे चला' या मंत्रामुळे व्यापक राजकीय, सामाजिक बदल घडत गेले आणि मराठी साहित्य हे खेड्याकडे वळले. श्री.म. माटे यांच्या कथा, र.वा. दिघे यांच्या कादंबऱ्या आणि लगेचच्या काळातील ग.ल. ठोकळ यांच्या कविता, कथा, कादंबऱ्यांनी ग्रामीण साहित्याकडे वाचकांना आकर्षित केले. १९२५ ते १९४० च्या दरम्यान 'प्रादेशिक', 'ग्रामीण' असे शब्दप्रयोग साहित्यात येऊ लागले. गोव्यातील लेखक वि.स. सुखटणकरांचा १९३१ साली प्रसिद्ध झालेला 'सह्याद्रीच्या पायथ्याशी' हा कथासंग्रह प्रादेकिशकतेची वैशिष्ट्ये धारण करूनच आला. गोव्यातीलच लक्ष्मणराव सरदेसाई यांनीही गोमंतकीय प्रादेशिक जीवन आपल्या कथांतून चित्रित केले. त्यानंतर व्यापक प्रादेशिक चित्रणे साहित्यातून अवतरली. र.वा. दिघ्यांनी 'वादळ' कथासंग्रहातून कोकणी माणूस आणि कोकणातील जीवन रेखाटले. हे लिखाण जसे प्रादेशिक समजले गेले तसेच ग्रामीण म्हणूनही मान्यता पावले. ग.ल. ठोकळांनी निर्माण केलेल्या समग्र ग्रामीण साहित्यामुळे ते ग्रामीण साहित्यिक म्हणून मान्यता पावले. त्यांच्या कथेने अस्सल ग्रामीण कथा विस्तारली, लोकप्रिय झाली. पुढे १९४१ मध्ये 'महार माटे' म्हणून आणि त्याचबरोबर 'समाज शिक्षक' म्हणून

ISBN 978-81-925945-0-7

ज्यांना संबोधण्यात आले होते, त्यांचा 'उपेक्षितांचे अंतरंग' हा कथासंग्रह अवतरला आणि दलित, ग्रामीण, प्रादेशिक साहित्याची वैशिष्ट्ये एकमेकांत शिरली. दलित, उपेक्षित समाजामध्ये मिसळून माट्यांनी त्यांची सुखदु:खे, वेदना, भोग समजून घेतले आणि माणुसकीपोटी ते पोटतिडिकेने साहित्यातून मांडले. 'यापूर्वीची बहिरंगावर आत्मतुष्ट असलेली ग्रामीण कथा अंतरंग दर्शनाने कसदार बनली. खरा ग्रामीण माणूस जीवनाच्या अंत:स्यूत जाणिवेनिशी ग्रामीण साहित्यात माटेंनी चित्रीत केला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने ग्रामीण कथा आशय, अभिव्यक्तीच्या दृष्टीने गुणवत्तापूर्ण कसदार बनली आहे. म्हणून त्यांच्याकडे ग्रामीण कथेचे जनकत्व जाते.'[३] पण दलित जीवन चित्रण करणे म्हणजे दलित साहित्य नव्हे, अशा विचारसरणीने दलित आणि ग्रामीण साहित्याचे प्रवाह अंतर राखूनच पुढे निघाले. गांधीजींचा 'खेड्याकडे चला'चा संदेश आणि त्याच वेळी डॉ. आंबेडकरांचा 'शहराकडे चला'चा संदेश परस्परविरोधी होता. त्याचेही परिणाम या साहित्यिकांच्या मनावर, परिणामी साहित्यावर झाल्याचे जाणवते.

दुसऱ्या महायुद्धात झालेला भयंकर विनाश, १९४२ ची क्रांती यांमुळे ग्रामीण जीवन बदलले. खेड्यातला तरुण शिक्षित होऊ लागला. एकीकडे १९४५ ते १९५०च्या दरम्यान अरविंद गोखले, पु.भा. भावे, गंगाधर गाडगीळ यांची नागरकथा आणि पुढे साहित्यात नवकथा अवतरली. त्याच वेळी व्यंकटेश माडगूळकर माणदेशातील भोगवटे, रंजलीगांजली 'माणदेशी माणसं' परिसरवैशिष्ट्यांसह चितारीत होते. जिवंत अनुभव, आशयसंपन्न आविष्कार, कलेचे परिमाण लाभलेल्या त्यांच्या लेखणीने 'बनगरवाडी'सारखी कादंबरी मराठी साहित्याला दिली आणि ती प्रादेशिक–ग्रामीण साहित्य प्रवासातील मैलाचा दगड ठरली. ग्रामीण जीवनातील ताणतणाव, निसर्गाशी ग्रामीणांचे असलेले नाते माडगूळकरांच्याच काळात शंकर पाटलांनी 'ताजमहालमध्ये सरपंच', 'खट्याळकी', 'वळीव' अशा कितीतरी कथासंग्रहांतून मांडले. मानवी मनाची गुंतागुंत साकारणारे एक सक्षम ग्रामीण लेखक म्हणून त्यांच्याकडे बघितले जाते तर अण्णाभाऊ साठे यांनी 'खुळंवाडी', 'बरबाद्या कंजारी', 'फरारी' अशा

ISBN 978-81-925945-0-7

कथासंग्रहातून ग्रामीण मातीची अस्सल चव घडवली. कल्पनेचे पंख लावून भराऱ्या मारण्यापेक्षा वाट्याला आलेले जीवन अनिवार जिव्हाळ्याने जसे भोगले तसे मांडले, अशी अण्णाभाऊंच्या लेखणीची किमया होती आणि साहजिकच दलित साहित्यिक म्हणून जसा त्यांना मान मिळाला तसा ग्रामीण साहित्यिक म्हणूनही मिळाला. शंकरराव खरातांनी 'बारा बलुतेदार', 'तडीपार', 'सांगावा'सारख्या कथासंग्रहांतून दलित जीवनालाच रंगविले; परंतु त्यातील बहुतेक जीवनसंदर्भ हे खेड्यापाड्यांतील आहेत, सामाजिक कोंडीबरोबरच ग्रामीणत्वाचा पिंड असणारे आहेत.

१९४७ च्या दरम्यान स्वातंत्र्योत्तर ग्रामीण साहित्यिकांची पहिली पिढी नवसाहित्याच्या काळातच जन्माला आली आणि साहित्याचे स्वरूप बदलून टाकले. १९६०–६५ पर्यंत जोमाने ग्रामीण कथानिर्मिती आणि त्याखालोखाल कादंबरीनिर्मिती झाली. लोकप्रियतेच्या कळसावर जातानाच या पिढीने महाराष्ट्रभर कथाकथनाचे कार्यक्रम राबविले आणि यावर नंतर मनोरंजन करणारी कथा म्हणून शिक्का बसला. १९७५ पर्यंत ग्रामीण कथा म्हणजे विनोद, किस्से सांगणारी किंवा टवाळकी, तपशीलवार वर्णने मांडणारी गोष्टीवेल्हाळ म्हणून ओळखली जाऊ लागली. मात्र या संपूर्ण साहित्यात विशिष्ट प्रदेशांची वैशिष्ट्ये त्या त्या साहित्यकृती व लेखकांनुसार अवतरत होती आणि दलित जीवनाच्या वर्णनापासून ती दूर होते आहे की काय, असे वाटू लागले.

पुढे एक चळवळ म्हणून ग्रामीण साहित्य १९७५ नंतर उदयास आले. ही खेड्यात राहणाऱ्या माणसाची साहित्य चळवळ नव्हती तर महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या सुखदु:खाशी जोडलेल्या सर्वच माणसांची वाङ्मयीन व सांस्कृतिक जाणिवेची चळवळ होती. ग्रामीण साहित्यातच नव्हे तर समग्र मराठी साहित्यात भूमिनिष्ठ देशी व वास्तववादी जाणिवा रुजविणाऱ्या महात्मा फुल्यांपर्यंत हा मूलस्रोत नेता येतो. त्यांच्या १९८५ साली मराठी ग्रंथकार सभेस उद्देशून लिहिलेल्या पत्रातून ही जाणीव घोषित होते. 'म. फुले, कृष्णराव भालेकर, धनुर्धारी, ना.वि. कुलकर्णी, वि.स. सुखटणकर, र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ,

ISBN 978-81-925945-0-7

श्री.म. माटे, शंकरराव खरात, अण्णाभाऊ साठे, श्री.ना. पेंडसे, गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगूळकर, उद्धव शेळके, शंकर पाटील, रणजित देसाई, रा.रं बोराडे, आनंद यादव, उत्तम बंडू तुपे अशी ग्रामीण लेखकांची परंपरा निर्देशिता येईल. १९७५ नंतर या प्रवाहाने चळवळीचे स्वरूप धारण करून साहित्यनिर्मिती ही सामाजिक–सांस्कृतिक घटना असते, याचे भान निर्माण केले. अर्थातच दलित साहित्य चळवळीचा उदय व उद्रेक ही घटना सांस्कृतिक चलनवलनास अनुकूल ठरली, प्रेरक ठरली.'[४]

आधुनिक मराठी वाङ्मयात प्रादेशिक साहित्याने प्रदेशविशिष्ट जीवनदर्शनाने निराळ्या संस्कृतीचे दर्शन घडविले. लोकसांस्कृतिक जीवनाचे चित्रण हा या वाङ्मयाचा गाभा असतो. लोकजीवनातील श्रद्धा, रूढी, परंपरा, लोकसमजुती, देवदैवते, लोकविधी इत्यादी घटकांचे दर्शन या साहित्यातून होते. ते समूहाने होते आणि त्याची नाळ निसर्गाशी, त्या प्रदेशाशी आणि पर्यायाने ग्रामीण भागाशी घट्ट जुळलेली असते. विशिष्ट प्रदेशातील बोली या निमित्ताने मराठी साहित्यात अवतरल्या.

उद्धव शेळके यांच्या कथा किंवा 'धग'सारख्या कादंबऱ्या वऱ्हाडातल्या विशिष्ट प्रदेशात घडतात आणि 'प्रादेशिक' ठरतात. त्यांना ग्रामीण म्हणूनही मान्यता मिळते. 'ग्रामीण वाङ्मय व प्रादेशिक वाङ्मय यांचा अन्योन्य संबंध आहे, त्यामुळे एकास टाळून दुसऱ्याचा विचार करता येणार नाही. म्हणून पहिली प्रादेशिक कथा ही ग्रामकथाच असणार. तात्पर्य प्रादेशिकत्व आणि ग्रामीणत्व दोन्ही समानार्थीच गृहीत धरून संबोधले जाई.'[५] प्रदेशाला केंद्रिभूत मानून निर्माण साहित्याला 'प्रादेशिक' आणि खेड्यापाड्यातल्या वर्णनपर आणि तिथल्या मनुष्याला केंद्रिभूत मानून निर्माण साहित्याला 'ग्रामीण' म्हटले तर थेट चक्रधरांच्या लीळांपर्यंत किंवा ज्ञानेश्वरांच्या ओव्यांपर्यंत पोचावे लागेल. संत साहित्य, लोक साहित्य यांमधूनही ग्रामीणतेचे, प्रादेशिकतेचे संदर्भ आढळतात. मात्र जशी डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर निर्माण झालेली साहित्य चळवळ व निर्मिती ही दलित साहित्य म्हणून स्वीकारली गेली, तशी महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा असूड'सारख्या

ISBN 978-81-925945-0-7

आविष्कारानंतर व ग्रामीण साहित्याचीही संकल्पना स्वीकारली गेली, हे लक्षात घेतले पाहिजे. 'ग्रामीण साहित्याची प्रेरणा ही सम्यक् परिवर्तनाची आहे. म. फुले यांचा परिवर्तनादी विचार ग्रामीण माणसाच्या शोषणाविरुद्ध आणि त्यांना सोसाव्या लागणाऱ्या विषमतेविरुद्ध आहे.'[६] वास्तविक दलित साहित्य काय किंवा ग्रामीण साहित्य काय, दोन्हींचा प्रारंभ दु:ख, वेदना, अन्याय, अत्याचार, शोषण येथूनच झालेला दिसतो. मात्र पुढे दलित साहित्यात कविता आणि आत्मकथन वगळता नवनवीन प्रयोग फारसे यशस्वी झाले नाहीत आणि ती चळवळ नकार, विद्रोह यांतच गुरफटून राहिली तर ग्रामीण साहित्य चळवळीने पुढे बदलते राजकारण, समाजकारण, जागतिकीकरणाचे प्रभाव, विनोदनिर्मितीसारखे अनेक प्रयोग केले. साहित्याचे सर्व प्रकार हाताळले आणि ही चळवळही प्रवाही राहिली. दलित साहित्यात पुढे काय, यावर विचारमंथन सतत सुरू आहे. फार व्यापक बदल या साहित्यात होत असल्याचे दावे जरी होत असले तरी हा प्रवाह काहीसा क्षीण झाला आहे, हे मान्य करावे लागते. स्वत:च्या वेगळ्या चुलीला सर्वसमावेशक न केल्याने आणि विशिष्ट स्वरूप, व्याख्येच्या परिघात बांधून घेतल्याने दलितेतरांनी ज्या जोमाने एकेकाळी काहीतरी वेगळे म्हणून दलित साहित्याला डोक्यावर घेतले तसे आज दलितेतरांकडून उचलले जात नाही आणि आज पूर्वीसारख्या दलितत्त्वाच्या खुणा न राहिल्यानेही ती शहरी भागाप्रमाणेच ग्रामीण भागातूनही बाहेर पडल्यासारखी झाली. प्रादेशिक साहित्याचा प्रवाहही क्षीण झाला. जागतिकीकरण आणि दळणवळणाच्या सुविधांमुळे माणसाचे जगण्याचे संदर्भच बदलले. केवळ एकाच प्रदेशात राहणारी आणि जीवन व्यतीत करणारी माणसेच कमी झाली. लेखक शहरांकडे वळले. ग्रामीण भागात राहून ग्रंथनिर्मिती करणारे इतिहासजमा झाले. जुन्या पिढीतील जे ग्रामीण साहित्यिक आजही लिहीत आहेत, त्यांना वगळता नवीन पिढीतील लेखकांचा ग्रामजीवनाशी प्रत्यक्ष संबंध तुटत गेल्याने मोजके अपवाद वगळता अननुभवान्ती कसदार लेखन आढळत नाही. तसे ग्रामीण साहित्य आणि दलित साहित्य चळवळीचे यशापयश, या चळवळींनी किती दलित आणि ग्रामीण साहित्यिक, समीक्षक दिले यांचीही

ISBN 978-81-925945-0-7

नेहमी तुलना केली जाते. तसे हे दोनही प्रवाह परस्परपुरक आहेत, हे बरेचदा समीक्षक विसरतात. दोन्ही प्रवाहांचे वैचारिक आधिष्ठान म. फुल्यांच्या 'शेतकऱ्यांचा असूड'शी जोडले जाते. आज कितीतरी समीक्षक खेड्यात किंवा दलितत्वाच्या परिघात वास्तव्यास नसून ते शहरी चष्मे डोळ्यांवर चढवून एसीच्या थंड वातावरणात बसून विद्रोह, नकार, ग्रामजीवनातील सुख:दुखे यांचे ज्वलंत विश्लेषण करण्याचा आव आणतात. दलित साहित्याविषयी स्वागतशील भूमिका आणि ग्रामीण साहित्याची हेटाळणी करण्याचे प्रकारही मध्यंतरीच्या काळात झाले. दलित साहित्याला काही स्वतंत्र नियतकालिके मिळाली; पण ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याच्या बाबतीत तसे घडले नाही. आजही शहरी भागातली नावाजलेली नियतकालिके बोलीभाषेतील साहित्य प्रकाशनार्थ स्वीकारत नाहीत. शेवटी 'कालानुरूप परिवर्तन' हा न्याय या तीनही प्रवाहांनाही लागू आहेच, हे विसरता येणार नाही.

आपली सर्वांची नाळ ही कुठल्या ना कुठल्या प्रकारे ग्रामीण जीवनाशी, शेतीशी आणि पूर्वापार चालत आलेल्या रूढी, परंपरांशी जुळलेली असते. विद्रोह, नकार, शहरीकरण, जागतिकीकरण हे मुद्दे कितीही उचलून धरले तरी शेवटी या मातीतला जीव मातीतच जाणार, हे चिरंतन सत्य नाकारता येणार नाही. अशा परिस्थितीत दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्याचा जो अमूल्य ठेवा मराठी वाङ्मयाला मिळालेला आहे, तो असा दुर्लक्षित करून चालणार नाही. नैराश्येतून या तीनही प्रवाहांकडे न पाहता अशी आशा करायला हरकत नाही की समीक्षकांचा दृष्टिकोन सकारात्मक होऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात हे तीनही प्रवाह पुन्हा एकदा आपले वर्चस्व गाजवतील. लिहिणारी जुनी आणि नवी पिढी नव्याने आपल्या दलित, ग्रामीण किंवा प्रादेशिक जाणिवांना आजच्या युगातील नवीन प्रवाहांमध्येसुद्धा ताकतीने मांडण्याकरिता आपली शक्ती पणाला लावेल आणि एकसुरीपणा, प्रत्यक्षानुभवाचा अभाव अशा आरोपांतून हे तीनही प्रवाह बाहेर येतील, प्रवाही होतील आणि चिरकाल टिकतील.

ISBN 978-81-925945-0-7

संदर्भ

१. भगत, दत्ता, 'दलित साहित्याची संकल्पना', दलित साहित्य, संपा. डॉ. भानचंद्र फडके, श्री. दादा मोरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण १९९५, पृ. १८

२. मंचरकर, (डॉ.) रत्नाकर, 'ग्रामीण कादंबरी : १९६० ते १९८० आणि नंतर', ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा. चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण २०१३, पृ. ८६

३. नलगे, चंद्रकुमार, 'ग्रामीण कथा : प्रेरणा व विकास', ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा. चंद्रकुमार नलगे, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती पुनर्मुद्रण २०१३, पृ. १११

४. ठाकूर, (डॉ.) रवींद्र, 'ग्रामीण साहित्य चळवळ : एक वाङ्मयीन दृष्टिकोन', ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, संपा. वासुदेव मुलाटे, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, १९९६, पृ. १४३

५. कागणे, मा.ना., 'प्रादेशिक साहित्यकृतींच्या अभ्यासाची दिशा', मराठी प्रादेशिक वाङ्मय, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९९६, पृ. ४

६. फडके, (डॉ.) भालचंद्र, किरवले, (डॉ.) कृष्णा, ग्रामीण साहित्य, संपा. डॉ. भानचंद्र फडके, श्री. दादा मोरे, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथमावृत्ती १९९२, पृ. २४

**– डॉ. पवन मांडवकर**

प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब,

जि. यवतमाळ ४४५४०१, भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८